# प्रकरण दुसरे

## *दलित व वंचित आत्मकथन: एक विचार*

# प्रकरण दुसरे

# दलित व वंचित आत्मकथन : एक विचार

## मराठीतील आत्मचरित्राचे स्वरूप :

अव्वल इंग्रजी कालखंडापासून आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार आपल्याकडे रुढ झाला. निरनिराळ्या क्षेत्रातील निरनिराळ्या व्यक्तींनी आपापले आत्मचरित्र लिहून हा वाङ्मयप्रकार समृद्ध केला आहे. मराठीत आत्मचरित्रे आली ती प्रामुख्याने सवर्ण व्यक्तीकडूनच या व्यक्ती त्यांच्या क्षेत्रातील नामवंत होत्या. आणि आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी आत्मचरित्रांचे लेखन केले.

मराठी साहित्यात स्वातंत्र्यपूर्व काळातील उत्कृष्ट आत्मचरित्र म्हणजे लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' १९३४ ते १९३६ मधील होय. या आत्मचरित्रामध्ये तत्कालीन समाज परिस्थितीचा एक आलेख वाटतो त्याचबरोबर ते प्रांजळ आणि वास्तवदर्शी आहे. त्याला कलात्मकतेची उत्कृष्ट जोड मिळाली आहे. मनमोकळेपणानेआत्मनिवेदन करत समर्पक साध्या भाषाशैलीचा वापर करत लिहलेले आत्मचरित्र आहे.

## दलित साहित्याची पार्श्वभूमी :

स्वातंत्र्यपूर्व काळात अस्पृश्य समाजामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या जागृती घडवून आणण्याचे खूप मोठे कार्य महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, वि. रा. शिंदे, म. गांधी, आणि कर्मवीर भाऊराव पाटील इ. पुरोगामी समाज सुधारकांनी केले हेच कार्य नंतरच्या काळात अस्पृश्य समाजामध्ये जन्मलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म. फुले, गौतम बुद्ध यांना धर्मगुरूस्थानी मानून केले. त्यांच्या कार्याचा आणि वैचारिकतेचा वारसा घेऊन त्यांनी अत्यंत जोमदार व आत्मसन्मानाने अनेक चळवळी, लढे उभे केले. आपल्या उपेक्षित, दलित बांधवांना आपण अस्पृश्य व गुलाम असल्याची जाणीव करून दिली. ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' असा संदेश दिला. त्यांच्या तेजस्वी विचारांमुळे तत्वज्ञानामुळे, युगप्रर्वतक नेतृत्वामुळे शैक्षणिक कार्यामुळे आणि विशेषतः धर्मांतरामुळे हजारो वर्षे अंधारात खितपत

पडलेल्या व किड्या-मुंग्यासारखे जीवन जगणाऱ्या दलित समाजात नवचैतन्यतेची लाट उसळली. तो शिकू लागला. शिक्षणाने त्यांची दया आणि याचनेची वृत्ती नष्ट होऊन तो जागृत झाला. त्याचा स्वाभीमान व अस्मिता जागृत झाली. त्याला आत्मभान व अस्तित्व भान आहे. ज्या समाजव्यवस्थेमुळे धर्म-जाती व्यवस्थेमुळे, भोळसट रूढी-परंपरा व कल्पनांमुळे त्याला माणसासारखे जगता आले नाही त्याविषयी अत्यंत विद्रोहाची भावना दु:ख व्यथा वेदना तो प्रथम काव्याच्या रूपाने शब्दबध्द करू लागला.

यामुळे मराठी वाङ्मयात 'दलित साहित्य चळवळ' नावाचा एक वेगळा साहित्यप्रवाह उदयास आला. स्वातंत्र्योत्तर काळातील या अत्यंत जोमदार गतीमान व प्रभावी साहित्य प्रवाहाच्या निर्मितीमुळे मराठी वाङ्मयाचे अनुभव क्षेत्र अधिक रुंदावले. समृद्ध संपन्न व समाजाभिमुख झाले. इतकेच नव्हे तर मराठी साहित्याला एक वेगळे वळण लागले. नवा आशय व नवी अभिव्यक्ती मिळाली. मराठी साहित्याला वास्तवतेचे भान आणून देण्याची फार मोठी कामगिरी या जिवंत, जीवनदायी प्रवाहाने केली आहे. 'दलित साहित्य' ही एक सांस्कृतिक चळवळ असून तिचा सरळ संबंध सामाजिक परिवर्तनाशी आहे. तिला सामाजिकतेचे भक्कम अधिष्ठान आहे. आजच्या मराठी वाङ्मयात 'दलित साहित्य' हा एक महत्वाचा साहित्यप्रकार म्हणून ओळखला जात आहे. कविता, कथा, कादंबरी, नाटक व आत्मकथन इ. विविध अंगांनी दलित साहित्याची निर्मिती होत आहे. या साहित्याला सामर्थ्यवान लेखक लाभले आहेत. लाभत आहेत. हे मराठी साहित्याच्या दृष्टीने लक्षणीय गौरवाची गोष्ट आहे.

## दलित साहित्याची निर्मिती प्रेरणा :

दलित साहित्याची निर्मिती प्रेरणा स्पष्ट करण्याचा उगमस्थान शोधण्याचा प्रयत्न अनेकांकडून झाला आहे. होत आहे. काहीजण तो उगम बुद्धकाळात शोधतात, काहीजण संतकवी चोखा मेळ्यापर्यंत जातात. काही क्रांतीवीर फुल्यापर्यंत पोहचतात, काही श्री. म. माटे यांच्यामध्ये शोधण्याचा प्रयत्न करतात. तर काही तो कार्लमार्क्समध्ये शोधतात. या त्यांच्या विधानाच्या समर्थनासाठी ते अशी बाजू मांडतात की, जरी त्यावेळी 'दलित साहित्य' ही संज्ञा वापरली गेली नसली तरी त्या त्या काळात दलितांविषयी पिळल्या जाणाऱ्यांविषयीच्या अन्यायाविरुद्ध त्यांनी आपल्या लेखणीद्वारे वाचा फोडली आहे. म्हणून ते खरेखुरे

'दलित साहित्याचे जनक' होत. जी मंडळी ही विधाने करतात. त्यांची तार्किकता खूप ताणल्यासारखी वाटते. क्रांतीवीर फुले काय किंवा गौतमबुद्ध काय त्यांनी निश्चितच विषम समाजाविरुद्ध बंडाचे निशाण रोवले. त्यावर हल्ला चढवून 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' असा नारा लावला. त्यांची शिकवण त्यांचे आदर्श हे सतत प्रेरणादायी ठरतील यात शंका नाही. परंतु ऐतिहासिक व वस्तुनिष्ठ पद्धतीने विचार व मूल्यमापन केल्यानंतर हे स्पष्ट दिसून येईल की, 'दलित साहित्याचे बीज किंवा प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, त्यांची जीवनदृष्टी, त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध दिलेले लढे, केलेले संघर्ष, सत्याग्रह आणि धर्मांतर या अनुषंगाने त्यांनी केलेल्या चळवळी ह्या आहेत त्या सगळ्यांचा इतिहास देणे येथे शक्य नाही. या सर्व गोष्टीमुळे दलित समाज मानसिक गुलामगिरी व लाचारीतून मुक्त झाला. म्हणू न दलित साहित्याचे मूळ प्रेरणास्तोत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच होत. शिवाय अनेक दलित लेखकांनी हे स्पष्ट केले आहे की, माझ्या लेखनाची मुख्य प्रेरणा आंबेडकर हीच आहे. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानापासून मिळालेल्या प्रेरणा''[१] असल्याचे वामन निंबाळकर सांगतात. दलित साहित्याचे एक प्रवर्तक डॉ. गंगाधर पानतावणे यांनी तर स्पष्ट म्हटले आहे की, 'दलित साहित्य चळवळीचे आद्य प्रेरक प्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच असून बाकीचे आम्ही सारे त्यांचे पाईक आहोत.''[२]

यावरून हे स्पष्ट होते की, दलित साहित्याची मुख्य प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच असून त्यांनीच दलित साहित्याचा मूळ पाया घातला, तरीही दलित साहित्याची निर्मिती-प्रेरणा स्पष्ट करताना प्रा. डॉ. वि. स. जोग म्हणतात की, ''दलित साहित्याची निर्मिती सामुदायिक असून या निर्मितीत मार्क्सचा सहभाग आहे.''[३] तर दलित कथेचे शिल्पकार म्हणून सर्व परिचित असलेले बाबुराव बागुल म्हणतात, ''मार्क्सने मला दिलेल्या वैचारिक धनाचा मी कृतार्थ आहे.''[४]

वरील दोन्ही विधाने लक्षात घेण्यासारखी असली तरी हे अगदी सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे की, मार्क्सवाद व डॉ. आंबेडकर वाद या दोन्ही विचारधारा अगदी पूर्णपणे भिन्न आहेत. मार्क्सची कल्पना विषमतेवर आधारलेली आहे, तर सामाजिक क्रांतीची आंबेडकरवादी कल्पना, भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक आणि धार्मिक विचार करणारी आहे. मार्क्स हा काही भारतात जन्मला नसल्याने त्याला भारतीय समाजव्यवस्थेची कल्पना नव्हती. म्हणजेच त्याची कल्पना उपरी आहे. डॉ.

आंबेडकरांचा विचार हा या भूमीत जन्मलेला सामाजिक क्रांतीचा आहे. या संदर्भात नारायण सुर्वेंचे मत योग्य वाटते. ''मार्क्सवादी मंडळीनी येथील परंपरा, माती, पाणी, वृत्ती यांचा विचार न करताच, सरधोपटपणे मार्क्सवाद रुजविण्याचा प्रयत्न केला.''[५] याचाच अर्थ पाश्चत्याप्रमाणे मार्क्सवादाचा अर्थ लावला जातो. तसा लावणे योग्य वाटत नाही. डॉ. आंबेडकरांचा विचार हा या भूमीत जन्मलेला सामाजिक क्रांतीचा आहे. मार्क्सवादी दृष्टिकोन भौतिकवादी असून कामगारांना संघटित होऊन भांडवलशाही विरुद्ध संघर्ष करण्याचे आवाहन मार्क्सने केले. शोषकांविरुद्ध संघर्ष केल्याशिवाय शोषितांची प्रगती होणार नाही ही मार्क्सची भूमिका होती. परंतु भारतीय समाजव्यवस्था ही जातीवादी असल्याने मार्क्सवाद येथे दुबळा ठरतो. शोषक आणि शोषितांमधील अंतर दूर करून आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न मार्क्सने केला. परंतु हे सत्य आहे की, दलितांचा प्रश्न केवळ आर्थिक समतेने सुटणार नाही. त्यांची खरी समस्या सांस्कृतिक व सामाजिक आहे. त्यांना प्रस्थापितांविरुद्ध, जातीयतेविरुद्ध सतत संघर्ष करावा लागतो. म्हणून जोपर्यंत भारतात जातीयता आहे तोपर्यंत मार्क्सवाद भारतात रूजू शकणार नाही. शिवाय मार्क्सवादी साहित्य संकल्पना ही प्रत्यक्ष जीवनातून उगम पावते व तिला सामाजिक आशय प्राप्त होतो. ही जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी व त्यांच्या लढ्यांनी घडविलेली आहे. आणि म्हणून दलित साहित्याची मुख्य प्रेरणा डॉ. बाबासाहेब व त्यांचे तेजस्वी विचार व युगप्रवर्तक नेतृत्व हेच ठरते.

अस्पृश्यतेला गौणत्व देऊन ती नष्ट होणार आहे काय? आणि वस्तुस्थितीचा विपर्यास म्हणजे तिची व्याख्या ठरते काय? ''दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे, तर जे जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत ते सर्व 'दलित' या व्याख्येत समाविष्ट होतात, असे म्हणण्याने अन्याय करणारे आणि अन्यायाचा बळी ठरणारे त्यांना एकत्र बांधण्यात येते''[६] हे राजा ढाले यांचे मत विचार करण्यासारखे व वस्तुस्थितीवर आधारीत आहे. दलितांवर होणाऱ्या अन्यायाचे मुख्य कारण जातीयता हे आहे. आर्थिकता हे नाही. म्हणून मार्क्सवादापासून दलित साहित्यिकाने दूर राहणेच हिताचे होईल.

या देशातील समाज व्यवस्थेमध्ये सगळ्यात अधिक जर कोणी पिळला गेला असेल तर तो अस्पृश्य समाज. आजही तो सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय व मानसिक दृष्टीने शोषण भोगतो आहे. त्यामुळे भारतीय समाज संस्कृतीच्या वास्तवात तोच खरा दलित आहे. दलित साहित्य म्हणजे फक्त

दलितांनी लिहिलेले साहित्य नव्हे. म्हणजेच दलित असणे व त्याचे लिहिणे म्हणजे दलित साहित्य नव्हे तर ''माणसांच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे माणसाला महान मानणारे, वंश, वर्ण आणि जातीच्या श्रेष्ठवादाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य''[७] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या दलित साहित्याचा 'माणूस' हा केंद्र असून हे साहित्य मानवतावादाचा पुरस्कार करते. अखिल मानवमुक्तीचा विचार करते. माणसामाणसात वैरत्वाची भावना निर्माण न करता बंधुत्व प्रेम समाजात रुजविण्याचा प्रयत्न करते. चांगल्या मूल्यांचा स्वीकार करते. म्हणून तर हे साहित्य श्रेष्ठ ठरते.

दलित साहित्य वयाने तसे मोठे नाही. तीस चाळीस वर्षाचाच इतिहास त्याच्या पाठीशी आहे. अल्पावधीतच दलित साहित्याने आपले वेगळेपण व वेगळेपणाचे मूलभूत गुणधर्म दाखविले आहेत. दलित साहित्याची निर्मिती ही मराठी समाजाच्या इतिहासात आणि मराठी वाङ्मय क्षेत्रात एक क्रांती आहे. एक सबंध समाजाची क्रांती याद्वारे मुक्रर होत आहे. गेल्या काही वर्षात दलित लेखकांची आत्मकथने, कथा, कादंबरी इ. साहित्य मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होत आहेत. त्यापूर्वी अस्पृश्य संतमंडळीनीही आपल्या रचनेतून आपल्या व्यथा, आपली दुःखे मांडली आहेत परंतु ही दुःखे मूलतः आध्यात्मिक स्वरुपाची होती. असे असले तरी त्यातून सामाजिक पीडा व्यक्त झालीच आहे. ही दुःखे एका विशिष्ट अनुभवाचे प्रतिपादन करण्यासाठी होती. चोखा मेळ्याचे 'विटाळाचे अभंग' हा त्याच्या आंतर वेदनेचा भाग होता तो त्याचा मानसिक आविष्कार होय. त्यातील उत्कटता आणि तीव्रता संवेदय आहे. 'याती हीन महार। पूर्वीचा नीळाचा अवतार' असा उल्लेख चोखा करतो. 'बहुत हिंडलो देशदेशांतर । परी मन नाही स्थिर झाले कोठे ॥'[८] हा आत्मानुभव ईश्वराच्या भेटीच्या संदर्भात व्यक्त होतो. आणि त्यातूनच 'नामसंकीर्तनाचा' मार्ग आढळतो. मात्र कर्मविपर्काच्या फेऱ्यातून ह्या अस्पृश्यांना बाहेर पडता आले नाही. 'तुझीये दारीचा कुतरा । नको मोकळू दातारा ॥' ही आर्त हाक त्यांच्या अगतिकतेची, असहायतेची साक्ष होती. हिंदू समाज व्यवस्थेत आणि ईश्वर साधनेत आपले मन आणि शरीर गुंतवून परमार्थ साधनेचे ध्येय बाळगणाऱ्या अस्पृश्य संतांच्या मनाचे दुखणे त्यांच्या रचनेतून प्रकट झाले आहे. हे स्पष्ट आहे. काहींच्या ठिकाणी बंडखोरी आहे असे एखाद दुसऱ्या अभंगाचा निर्देश करून काही अभ्यासकांनी घाईचा निष्कर्ष काढला आहे. चोखा मेळ्याचे 'विटाळाचे अभंग' किंवा कर्म मेळ्याचा देवाची लाज काढणारा अभंग ही त्यांची

आधारशीला असते. कोणतीही बंडखोरी ही त्या त्या व्यक्तीचा स्थायीभाव काय आहे ह्यावरून स्पष्ट होते. ह्या बंडखोरीचे अंतिमत्व कशात आहे ह्याचा शोधही महत्वाचा ठरतो. तेव्हा वरील दोन्ही संतांनी सामाजिक दु:ख व्यक्त केले असले तरी त्यात सामाजिक बंडखोरीचा अंश नाही. मात्र पारमार्थिक प्राप्तीसाठी धडपडणाऱ्या मनाचे आक्रंदन त्यात आहे हे निर्विवाद परंतु ज्या व्यवस्थेने आपले मन गुलाम केले. आपल्या जीवनात अंधार निर्माण केला. आपल्या जगण्याच्या वाटा बंद केल्या त्यासंबंधीचा विरोधी वा निषेधात्मक सूर कोठेही व्यक्त झालेला नाही. पूर्व जन्माच्या पातकामुळे आपण 'महार' झालो ही धारणा त्यांच्या परंपरावादी मनाचा उद्गार आहे. मात्र ह्या व्यवस्थेतून बाहेर पडू पाहणारे मन अस्पृश्य संतांच्या रचनेत प्रत्ययाला येत नाही.तरीही हा त्यांचा दोष नाही. हा धर्म दास्याचा परिपाक आहे हे लक्षात घेतले की, कर्ममेळ्याच्या देवाची लाज काढणाऱ्या काही ओळी त्यांची बंडखोरी प्रकट करीत नाहीत हे लक्षात येते. कारण त्याच अभंगात कर्ममेळा पश्चातदग्ध होऊन ईश्वरशरणता प्रकट करतो. त्याच्या इतर अभंगात तर तो पूर्णत: ईश्वराच्या प्रसन्नतेसाठी भुकेलेला किती व कसा आहे ह्याचे प्रत्यंतर येते.

दलित साहित्याच्या निर्मितीसंबंधी मांडण्यात आलेल्या विविध मतमतांतरांचा विचार करता हे स्पष्ट होते की, भगवान गौतमबुद्ध, महात्मा फुले, कार्ल मार्क्स व संत साहित्य यांच्या प्रेरणा दलित साहित्याच्या निर्मितीस वरवर पाहता कमी अधिक प्रमाणात कारणीभूत ठरतात असे वाटत असले तरी हे खरे आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांचे क्रांतीकारी विचार, युगप्रवर्तक तत्वज्ञान आणि त्यांची लखलखित जीवनगाथा हीच दलित साहित्याची प्रभावी व मुख्य प्रेरणा होय.

डॉ. आंबेडकर स्वत: जन्माने अस्पृश्य असल्याने जातीविषमतेचे अनेक चटके त्यांनी सोसले व अनुभवले होते. अवमानाची झळ त्यांना लागलेली होती. म्हणून तर आपल्या अस्पृश्य बांधवांना जागृत व शोषणमुक्त करण्याचे खूप मोठे कार्य त्यांनी केले. हिंदू धर्म, रुढी, परंपरा, बलुतेदारी इत्यादी वाईट चालीरीतींचा त्याग करून, स्वाभिमानाने स्वतंत्र जीवन जगण्याचा उपदेश त्यांनी आपल्या बांधवांना केला. यामुळे दलित समाजात नवचैतन्य संचारले. त्यांचा आत्मविश्वास व स्वाभिमान जागृत झाला. आंबेडकरांची बुद्धिनिष्ठा ही स्वाभाविक होती. तो बहाणा नव्हता. संघर्ष हेच त्यांच्या जीवनाचे सूत्र होते. हिंदू समाजाची सामाजिक विषमतेवर आधारलेली रचना उखडून टाकून सामाजिक न्यायावर व समतेवर

आधारित नवसमाज भारतात निर्माण व्हावा असा त्यांचा आग्रह होता. अन्यायाविरुद्ध झगडून आपले न्यायहक्क मागण्याचा विचार त्यांच्या प्रत्येक कृतीतून दिसून येतो. हिंदू समाजाच्या दानधर्मावर जगण्याची आता अस्पृश्यांना मुळीच इच्छा नाही. हे स्पष्ट करताना २६ मार्च १९४६ रोजी मध्यवर्ती विधिमंडळात केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''आम्हाला गुलामीत राहण्यास लावणारी, आम्हाला नीतिभ्रष्ट करणारी भीक मुळीच नको आहे. आम्ही आमच्या न्याय हक्कांसाठी झगडतो आहोत. आम्हाला ते मिळालेच पाहिजेत. आणि तुम्हाला मी निक्षून बजावतो की, जर आमच्या न्याय्य लढ्याला विरोध केला गेला तर रक्त सांडून आमचे हक्क मिळवू. आमचे ध्येय हस्तगत करू''[९] या किंवा आपल्या वाढदिवसानिमित्त त्यांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना दिलेला संदेश, ''झगडा, आणि आणखी झगडा, त्याग करा, आणखी त्याग करा. त्यागाची आणि हालाची पर्वा न करता एकसारखा झगडा चालू ठेवाल तरच तुम्हाला मुक्ती मिळेल''[१०] या सारख्या त्यांच्या क्रांतिकारी वाणीने शेकडो वर्ष पशूपातळीवर पशू म्हणून जगणाऱ्या दलित समाजाला मनुष्यत्वाची जाणीव झाली. तो माणूस म्हणून जगण्यास प्रवृत्त झाला. म्हणून तर दलित लोक जीवनाची व दलित साहित्याची प्रेरणा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याकडेच बोट दाखवावे लागेल. प्रा. गं. बां. सरदार यांनी तर स्पष्ट म्हटले आहे की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे विचार आणि कृती यांचे संमेलन, आंबेडकर म्हणजे संघर्ष, आंबेडकर म्हणजे पुरोगामी. आंबेडकर म्हणजे नव्या जीवनाचा नवा आविष्कार''[११] असा सार्थ शब्दात त्यांनी आंबेडकरांचा गौरव केला आहे. डॉ. भालचंद्र फडके म्हणतात की, ''परंपरा, पोथी आणि परमेश्वर नाकारण्याचे सामर्थ्य दलित लेखकांना आले ते आंबेडकरांच्या विचारधनामुळेच. दलित साहित्याच्या निर्मितीमागे बाबासाहेबांचा विचार आहे. त्यांच्या विचारामुळे ज्यांचा प्रकृतिधर्म घडला ते दलित लेखक विद्रोहाची ध्वजा घेऊन पुढे आले आहेत. हे विसरता येणार नाही''[१२] तर शंकरराव खरात म्हणतात की, ''समाज परिवर्तनाचे समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय आणि प्रज्ञा, शील, करुणा अशा अमूल्य मूल्यांवर आधारलेली नव समाज निर्मितीची नवी विधायक दृष्टी डॉ. आंबेडकरांनी दिली. म्हणून तर डॉ. आंबेडकरांचे जीवन आणि विचार दलित साहित्याच्या प्रेरणा होत.''[१३] तर डॉ. योगेंद्र मेश्राम म्हणतात, ''बाबासाहेब झाले नसते तर कदाचित तुम्ही-आम्ही-आपण झालो असतो की नसतो. आपल्या सामाजिक वाङ्मयीन शक्ती-प्रतिभेचा, वैचारिकतेचा तसेच सगळ्या

साहित्याच्या निर्मितीचा मुख्य प्रेरणास्त्रोत एकटे आंबेडकरच आहेत यात अतिशयोक्ती आहे, असे मला वाटत नाही''[१४] त्यांच्या विधानात भावनात्मकता अधिक आहे. असे वाटत असले तरी मला वाटते ही वस्तुस्थिती आहे.

वरील सर्व मतावरून हे अगदी स्पष्ट होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यामुळेच दलित समाजात नवचैतन्य संचारले. त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण झाली. त्याची लाचारी व न्यूनगंड जाऊन स्वाभिमान व आत्मविश्वास त्यांच्या ठिकाणी निर्माण झाला. किंबहुना आज दलित समाज जो ताठ मानेने उभा आहे तो केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तृत्वामुळेच होय. आपल्या कोट्यावधी बांधवांना हिंदू धर्माने केलेल्या कोंडीतून मुक्त करून त्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा करून दिला. तो शिकू लागला. शिक्षणाने त्यांच्या ठिकाणी जागृती निर्माण झाली. तो लिहू लागला. आपले दु:ख, विद्रोह शब्दबद्ध करू लागला. म्हणून दलित साहित्याची मुख्य प्रेरणा डॉ. आंबेडकर हेच ठरतात. डॉ. आंबेडकरासारख्या एका बंडखोराकडे दलित साहित्याचे जनकत्व जावे हाच दलित साहित्याचा लक्षणीय विशेष आहे.

१९६० च्या आसपास मराठी वाङ्मयात नवीन प्रेरणांचा उदय झाला आणि त्या प्रेरणांनी स्फूर्ती दिलेले दलित वाङ्मय जन्माला आलेले आहे. अर्थातच मराठी वाङ्मयात एक नवीन आणि जोमदार प्रवाह म्हणून दलित साहित्याने आपले स्वत:चे असे एक वेगळे स्थान निर्माण केले. दलित साहित्यातील प्रेरणा अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा होती. १९२७ चा 'महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह' किंवा 'काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह' आणि त्यानंतर बाबासाहेबांनी 'मी' हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' असे जाहीर करून १९५६ साली आपल्या सात लाख अनुयायांसह नागपूरच्या चैत्यभूमीवर बौद्धधर्म स्वीकारला. अर्थातच यामुळे दलितांच्या जगण्याच्या प्रेरणा बदलल्या आणि म्हणूनच डॉ. आंबेडकरी प्रेरणा मराठी साहित्यात अवतरली ती दलित साहित्याच्या रूपाने होय. दलित साहित्यामागील पार्श्वभूमी विचारात घेत असताना दलित समाजमनाची परिस्थिती आपण लक्षात घेतली पाहिजे. हजारो वर्षापासून दलितांवर अन्याय होत गेले. त्यांचे जीवन अमानुष पद्धतीने उध्वस्त केले गेले. अगदी आर्यकाळापासूनचा हा इतिहास म्हणजे दलितांच्या अवमानित जिण्याची साक्षच आहे.

**डॉ. यशवंत मनोहर :**

यशवंत मनोहर दलित साहित्याविषयी आपली भूमिका मांडताना म्हणतात की, ''दलित साहित्य हे वर्णबळीचे व वर्गबळीचे आहे. हे साहित्य डॉ. बाबासाहेबांच्या वाणीचा वाङ्मयीन वणवा आहे. संस्कृतीने ज्याची पोटे आणि मने उपाशी ठेवली त्या उपेक्षितांच्या हृदयाचे, मेंदूचे हे जिवंत ललित आकार आहेत. या साहित्याच्या पोटी एका मानवकेंद्री सुवर्णयुगाचा गर्भ वादळी निकराने वाढतो आहे.''[१५] यशवंत मनोहरांचे हे मत वस्तुनिष्ठ स्वरुपाचे आहे. कारण हजारो वर्षे अंधारात खितपत पडलेल्या जीवनाला आत्मभान आणून देण्याचे कार्य आंबेडकरांनी केले. डॉ. आंबेडकर नसते तर संपूर्ण दलित समाजाचे काय झाले असते? नुसते चित्र डोळ्यासमोर आणले तरी डॉ. आंबेडकरांचे अनन्यसाधारण महत्व आपल्या लक्षात येते. म्हणूनच दलित साहित्य, दलित जाणिवेची अभिव्यक्ती करू लागले. दलित साहित्य ही घटना दलित विश्वाच्या शोषितांच्या जगाची स्वातंत्र्याची आणि न्यायाची सनद आहे. आणि त्याला आर्थिक सामजिक इ. सर्वच पातळ्यांवर दलित साहित्य जन्माला घालणाऱ्या आणि त्याला संगोपिणाऱ्या ईश्वरवादाचा, कर्मविपाकाचा, मंदिरशाहीचा आणि प्रस्थापितांच्या सगळ्या शोषक मूल्यवस्थेच्या दहनाचा तो जाहीरनामाही आहे. दलित साहित्याचे प्रमुख डॉ. म. ना. वानखेडे दलित साहित्यविषयक म्हणतात ''दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य होय''[१६] डॉ. वानखेडे दलित साहित्याकडे सामाजिक दृष्टिकोनातून पाहतात. त्यांचे मत जन्मजात दलितत्वाला विशेष महत्व देणारी आहे. या शिवाय या साहित्यातून व्यक्त होणारा विद्रोह, अस्पृश्यता, रूढी-परंपरा यांच्या विरुद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

साठनंतर दलितांना नाकारण्यात आलेली जीवनक्षेत्रे संपादन करण्यासाठी सुरू झालेल्या लढ्याचे दलित साहित्य हे साधन बनले. त्यामुळेच दलित साहित्याला बहर आला. दलित साहित्य जास्त बंडखोर आणि लढाऊ ठरले. त्यात दलित कवितेच्या तुलनेत इतर दलित साहित्य एक आत्मचरित्रांचा अपवाद वगळता फारसे लोकप्रिय अगर प्रभावी ठरू शकले नाही.

दलित साहित्यात कविता विपुल झाली आणि म्हणूनच दलित साहित्यात कवितेला वेगळेच महत्व आहे. दलित साहित्यातील कथा, कविता, आत्मचरित्र यांच्या निर्मितीमागील प्रेरणा पूर्णत: सामाजिक स्वरुपाची आहे. त्यामुळे त्याचे आशयविश्व बहुतांशी सामाजिक जाणिवांनी मुक्त असे झाले आहे. दलित साहित्यातील अनुभवांचे स्वरूप इतर वाङ्मयातील अनुभवांपेक्षा मूलत: निराळे झाले. दलित साहित्याचा उगम दलित लेखकाच्या समूह-भावनेत उत्कट संघभावनेत असतो. त्यात समूह संवेदना असते.

दलित साहित्यातील आत्मचरित्राचा विचार करीत असताना एक गोष्ट जाणवते ती म्हणजे प्रस्थापित आत्मचरित्र लिखाणाचे सर्वच बंध दलित आत्मकथांनी झुगारून दिलेले असतात. आयुष्याच्या उत्तरार्धात केवळ त्या त्या क्षेत्रामध्ये प्रसिद्ध, नामवंत असणाऱ्या व्यक्तीनीच आत्मचरित्र लिहायचे हा दंडक दलित आत्मकथांबाबत लावता येत नाही. कारण आजच्या दलित आत्मचरित्रांवर स्थूल मानाने अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, सर्वच दलित आत्मचरित्रकारांनी वयाच्या चाळीस ते पंचेचाळीशीतच आपल्या आत्मकथा लिहिल्या. रूढ अर्थाने हे दलित आत्मकथनकार आत्मकथनानंतरच प्रसिध्दीस आले.

कांदबरी आणि नाटक वाङ्मयप्रकाराचे अजूनतरी दलित साहित्यिकांनी फारसे लेखन केलेले दिसत नाही. दलित कथा ह्या दलित आत्मकथेच्या जवळच येणाऱ्या वाटतात. त्यामुळे दलितांनी प्रामाणिक आत्मकथनाचा मार्ग पत्करणे वाङ्मयीन हित साधणारे तर ठरलेच पण दलित लेखकांना अभिप्रेत असलेली जीवन ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीनेही ते सहाय्यक ठरेल.

**दलित साहित्यातील आत्मकथने प्रारंभ :**

दलितांनी स्वत:च्या अनुभवांना आकार देण्यासाठी ही आत्मचरित्रे लिहिली. विषमतेवर आधारलेल्या समाज जीवनात आपण कसे भरडलो गेलो, ही आत्मकथनाची प्रबळ प्रेरणा त्यापाठीमागे दिसते. बलुतं, उपरा, आठवणीचे पक्षी, मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे, उचल्या, भटक्या, मरणकळा, कोल्हाट्याचं पोर इ. आत्मकथनांनी मराठी साहित्यातील आत्मचरित्रांचे दालन अतिशय समृद्ध केले.

**दलित साहित्यातील आत्मकथने - बलुतं :**

दया पवारांचे 'बलुतं' हे दलित साहित्यातील गाजलेलं असं पहिलचं आत्मचरित्र / आत्मकथन आहे. दया पवारांचे 'बलुतं' हे आत्मकथन दिनांक २४ डिसेंबर १९७८ रोजी 'ग्रंथाली' या वाचक चळवळीने प्रसिद्ध केले. बलुत्याने घालून दिलेल्या पायवाटेनेच दलितांची इतर आत्मकथनं मार्गक्रमण करीत आली आहेत. आणि म्हणूनच दलित आत्मकथनाच्या संदर्भात बलुत्याचे स्थान हे अनन्य साधारण आहे. स्वत: दया पवार म्हणतात. ''कोंडवाडा हा कवितासंग्रह लिहून झाला नसता तर 'बलुतं' लिहिता आले असते की नाही याची शंका वाटते.''[१७] दया पवारांच्या या विधानाचा विचार केल्यावर असे लक्षात येते की, पवारांनी कोंडवाडा लिहिला, कवितेच्या रूपाने भावनेचा पूर जेव्हा वाहून गेला. तेव्हा त्यांचे सारे आयुष्य त्यांना स्वच्छ दिसू लागले. आपल्याकडे अनुभव सांगण्यास जी दडपणे येतात ती मूलत: सांस्कृतिक नीतिमुल्यांमुळेच आणि यातूनच हळूहळू 'बलुतं' पवारांच्या मनात आकार घेऊ लागलं. त्यांच्या मते अनुभवाला अर्थ यावा लागतो. जाणिवा फुलाव्या लागतात आणि म्हणूनच एका सांस्कृतिक घुसळणीतून 'बलुतं' सारखं वाङ्मयकृती (साहित्यकृती) जन्माला आली.

बलुतंचे वेगळेपण सत्य घटनेत आहे असे म्हणावे लागेल. लेखकाने पुस्तकांच्या अंतरंगाची ओळख करून देतानाच म्हटले आहे. ''या पुस्तकातील प्रसंग घटना व पात्रे कुणाला काल्पनिक वाटल्यास तो केवळ योगायोगच समजावा''[१८] इतर पुस्तकांच्या अगदी बरोबर विरुद्ध विचारसरणी या पुस्तकाची आहे. अर्थातच हे आत्मकथन आहे. आणि त्यामुळे यातील पात्रे ही रंगविलेली नाहीत ती निवेदनाच्या ओघात आलेली आहेत. दलित लेखकांनी डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून लिखाण केले असले तरी ही त्या लिखाणात त्या लेखकाचा स्वानुभव व्यक्त झालेला आहे. किंबहुना आजच दलित लेखक आपण जे जीवन जगतो त्याचा अविष्कार संथ गतीने करीत आहे. त्याच्या साहित्याचा त्याच्या जगण्याशी संबंध आहे. आपले दाहक, अस्वस्थ करणारे, मनाला पोळणारे अनुभव तो जेव्हा लिहतो, तेव्हा ते खऱ्या अर्थाने मनाला स्पर्शून जातात.

बलुतं मध्ये दया पवारांना दगडू मारूती पवार स्वत:ची आत्मकहाणी सांगतो. स्वत:च्या व्यक्तीमत्वाची जडणघडण उलगडून दाखविण्यासाठी हे आत्मकथन लिहिलेली आहे. वास्तविक पाहता

दया पवार आणि दगडू पवार हे एकच आहेत पण लेखनात तटस्थपणा, अलिप्तपणा यावा असे वाटले असावे म्हणून त्यांनी अशी पोझ घेतलेली असावी.

दया पवारांनी स्वत:कडे अत्यंत तटस्थपणे पाहून केलेली ही स्वत:ची चिकित्सा आहे ऐन चाळीशीत पवारांनी हे केले याला फार महत्व आहे. दया पवारांचा आत्मशोध हा केवळ दया पवार एक व्यक्ती व तिचे जीवन, जीवनाभुव एवढ्याच पातळीवर थांबत नाही. तो त्याहीपुढे जातो आणि भारतीय समाजव्यवस्थेची, भीषण जातीभेदाची एक तीव्र व सतत जाणवणारी चौकट बलुत्याला आहे. दगडू मारूती पवार ह्याच्या वाट्याला आलेले हे दु:खाचे बलुतं की, जे भारतीय समाजव्यवस्थेचा एक अपरिहार्य भाग म्हणून त्याला भोगावं लागलं. त्या भोगवट्याची मन सुन्न करून टाकणारी कहाणी म्हणजे बलुतं आहे.

बलुतंमध्ये गावकुसाबाहेरचा महारवाडा, महारवाड्यातील भांडणे, मेलेल्या जनावरांच्या मांसासाठी होणारी भांडणे, चावडी, चावडीत होणारी भांडणे, महार म्हणून त्यांच्यावर लादलेली कामे, तालुक्याची कामे, दौंडी देणे, मयताचा सांगावा सांगणे, मयताचे जळण फोडणे या सर्वांचा मोबदला म्हणजे शिळ्या भाकरी घेणे. अंधश्रद्धा रूढी परंपरा यातून अनेक विधी करणे त्यासाठी कर्ज काढणे असे खेड्यातील वर्णन येते. तर शहरात कामधंद्याच्या निमित्ताने गेल्यानंतर फूटपाथवर, फूटभर जागेत दिवस काढावे लागतात. अशी अनेक दु:खे येतात बलुतं मध्ये बलुतं या शब्दाची भारतीय समाजव्यवस्थेत जडण-घडण कशी होते याचे उत्कृष्ट दर्शन घडते. या बलुतेदार लादलेल्या पद्धतीमुळे खेड्यात महार समाजाचे शोषण होते हे मान्य केले तरी तो शहरात गेल्यानंतर त्याच्या कामाचा योग्य मोबदला मिळत असूनही तो कंगाल बनतो याचे कारण माणसाच्या अंगी असणारी घमेंड, दाखवेगिरी, अहंकार, मिरवण्याची वृत्ती हे त्यांच्यामध्ये प्रकर्षाने दिसतात. ते उद्याचा कधीच विचार करत नाहीत थोडक्यात विचार करण्याच्या प्रवृत्तीचा अभाव आणि प्रचंड अज्ञान यामुळे हा समाज मागासलेला आहे.

'बलुतं' मध्ये आलेल्या दलित जीवन चरित्रातील दारिद्रय, उपेक्षा, उपासमार, अज्ञान, अगतिकता इ. वैशिष्टयपूर्ण संदर्भ प्रसंगापेक्षा त्यातील लैंगिक विषयाचे संदर्भ प्रसंग वाचकाने 'लक्ष' ठरले आणि ढोंगी परंपरावादी प्रस्थापितांनी या आत्मकथनावर टीकेचा भडिमार केला. दया पवारांना या

सामाजिक विरोधाला सामोरे जावे लागले. कारण परंपरावादी प्रतिगामी सोवळ्या मराठी साहित्यवाचकाला 'बलुतं' चा विषय, आशय अनोळखी व गुदमरून टाकणारा होता. त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या दलित आत्मकथनकारांना विरोध झाला. पण तो तेवढा तीव्र नव्हता नंतर नंतरच्या काळात तर सामाजिक विरोध थंडावला आणि जातवाले आणि कुटुंबिय मंडळीच विरोधाचे स्तोम माजवू लागले. सामाजिक विरोध वर्गीय भेदभाव होता. जातवाले व कुटुंबिय मंडळी आर्थिक लोभातून विरोधाला पुढे सरसावले होते असे त्या आत्मकथेच्या प्रक्रियेतून आढळते.

'बलुतं'च्या दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने लिहिलेल्या प्रस्तावनेत दया पवार म्हणतात, ''पुस्तकाची कोरी करकरीत प्रत हातात घेताना विस्तवाचा जळत निखारा घ्यावा तसं क्षणभर वाटलं, ज्या दलित समाजाचा आपण आलेख काढलाय, त्याला हे सारं सहन कसं होईल? समाजाच्या नीतिकल्पना, चालत आलेली मूल्य व्यवस्था ह्यांचा काच नकळत लेखकाच्या मानेभोवती आवळत असतो. समाजाची ही सेन्सॉरशिप मात्र आपण मुकाट मनाने स्वीकारत असतो.'' या लेखकाच्या विधानांवर जातवाले व टीकाकार यांचे प्रहार त्यांना सहन करावे लागतात हेच स्पष्ट होते.

## आठवणीचे पक्षी - प्र. ई. सोनकांबळे :

'आठवणीचे पक्षी' हे प्र. ई. सोनकांबळे यांचे आत्मकथन २७ जानेवारी १९७९ ला प्रसिद्ध झाले. हे आत्मकथन पंधरा भागात सांगितले आहे. प्र. ई. सोनकांबळे यांनी जीवनात आलेले लहानपणाचे अत्यंत भयानक व खडतर अनुभव उघडेनागडे चितारले आहेत.लहानपणीच आई वडिलांचे छत्र हरपले आणि बहीणीच्या आश्रयाने महार-मांग समाजाच्या संगतीने दिवस काढले. यामध्ये दारिद्र्य आणि भुकेचे प्रसंग हृदय पिळवटून टाकणारे आहेत. अनेक प्रकारची कामे करून अनाथाचे अनेक प्रकारचे दुःख अस्पृश्यतेचे दुःख सहन करून शाळेची वाटचाल केलेली आहे. या वाटचालीत मेलेल्या जनावरांच मांस आणतेवेळी किळस यायची पण न आणावे तर बहीण हाकलून देईल नाईलाजाने आणावेच लागे. तेही गर्दीत घुसून गुरुजींना समजले तर मार मिळेल पण त्याशिवाय तरणोपाय नव्हता. अंगाला कधी भरपूर कपडा मिळत नसे. कपड्याला साबण नसे. त्यामुळे खरजेसारखे रोग होत. अगोदर अस्पृश्य त्यात या

समस्याना सामोरे जावे लागे. पायाला पायतान मिळत नसे. पोटाला पोटभर अन्न मिळत नसे. कधी भाजीवर तर कधी उपाशीपोटी जीवन जगल्याचे अनुभव विशद केले आहेत. या वाटचालीत काही चांगली, काही वाईट माणसे भेटल्याचे सांगतात पण त्यांच्याबद्दल कटुता नाही, कडवेपणा नाही. आपल्याच वाट्याला असे का? म्हणून आक्रसताळेपणा किंवा उरबडबेपणा लेखक व्यक्त करीत नाही की तक्रार करीत नाही. त्याच्या ठिकाणी असलेला संयम समजूतदारपणा हा प्रथमपासून दिसतो. त्यांच्यावर झालेल्या संस्कारशीलतेच्या साथसंगतीने अनाथ असूनही अनेक प्रकारचे चटके सहन करून शिक्षण पूर्ण करतात. या त्यांच्या जीवनप्रवासातून एक आदर्श व्यक्तिमत्व दिसते. या आत्मकथनातून वाट्याला आलेले अनुभव हे एकट्या प्र. ई. सोनकांबळे यांच्या एकट्याच्याच वाट्याला आलेले आहेत असे नाही तर कमी अधिक प्रमाणात अवघ्या दलित समाजाच्या वाट्याला येणारे आहे. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत बाबुराव बागूल या संदर्भात लिहितात. ''उच्च वर्णातील मुलांतदेखील अशी गरिबी असू शकते. तो प्रल्हादसारखा उत्कृष्ट गुणाचा असेल तर माधुकरी मागून शिकू शकतो. पण दलित मुलाला प्रल्हादसारखे उत्कृष्ट गुण असूनही आपले नशीब काढणे अवघड होते. कारण अन्त्याजाच्या मुलाचे शिकणे कर्म नाही, शिकणे धर्म नाही. म्हणजे दलित मुलांविरुद्ध केवळ धर्मच नाही तर अर्थसत्ता आणि शासनसत्ताही नसते. म्हणजेच सर्वच प्रतिकूल असते. पण त्याच्या वर्णाच्या मुलाची गरिबी असली तरी त्याला गुणाच्या जोरावर पुढे जाता येते. जगू बघणाऱ्या शिकू बघणाऱ्या प्र. ई. सोनकांबळे यांच्या आठवणी म्हणजे दलित जीवनाचे करुण नाट्य आहे.''[१९] बाबुराव बागुलांचे हे विधान पूर्णांशाने सत्य वाटत नाही. परंतु त्यात तथ्य आहे. कारण कोणत्याही माणसाला धर्म साथ देत नसतो त्याला आलेल्या प्रतिकूल परिस्थितीशी झगडूनच ध्येय गाठावयाचे असते. प्रल्हादला सहानुभूती दाखवणाऱ्या, मदत करणाऱ्या व्यक्तिरेखांचा विचार केला तर विनायक गुरुजी, लक्ष्मीकांत गुरुजी, भिमराव बापू, शिवाजी बापू, सवर्ण मित्र, वडिलांचा मरसंगीचा मुसलमान मित्र, डॉ. वानखेडे या सर्वांनी मदत केली आहे. शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले आहे. ही कुणी एका जातीची नव्हती हे नजरेआड करता येणार नाही. या आत्मकथनाचे संदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात 'अशा करुण, निर्मळ, वास्तववादी लेखनामुळे धुमसणाऱ्या दलित मनाला विद्रोह निर्माण करण्याची, दास्यमुक्तीचे लढे उभारण्याची प्रेरणा मिळू शकते'[२०] 'आठवणीचे पक्षी' या संदर्भात बाळकृष्ण

कवठेकर लिहितात ''आठवणींचे पक्षी ही काही सलग संपूर्ण आत्मकथा नव्हे, स्फुट लेखनांतून उभ्या राहिलेल्या या आत्मकथेचे सामर्थ्य, सोनकांबळ्यांनी त्यांची संपूर्ण आत्मकथा तर लिहावीच पण अन्य लेखनही भरपूर करावे असे त्यांना आग्रहाने सुचवावेसे वाटण्याइतके मोठे आहे.''[२१] या दोन्ही मतात साम्य दिसते. ३ प्र. ई. सोनकांबळे यांच्या लेखन शैलीत व्यक्तिमत्वात भयानक जीवन वाट्याला येऊनही समजूतदार क्षमाशील तटस्थता अलिप्तता आत्मसमर्थन हे गुण उत्कृष्ट रेखाटले आहे एखाद्या उत्कृष्ट कलावंताचे गुण त्यांच्या आत्मकथेत येताना दिसतात म्हणून कवठेकर आग्रह धरत असावेत. ते योग्यच आहे. संयम, तटस्थता, अलिप्तता हे अत्यंत महत्वाचे घटक लेखकाने उत्कृष्टपणे हाताळले आहेत.

## मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे - माधव कोंडविलकर :

मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे हे माधव कोंडविलकरांचे आत्मकथन जुलै १९७९ मध्ये प्रसिद्ध झाले. या आत्मकथनात चांभार समाजाचे त्याचप्रमाणे कोकणातील समाज जीवनाचे चित्रण आले आहे.[१] कोकणात कुठेही कुणब्याची वस्ती अधिक इतरांची फुटकळ. प्रत्येक जातीची वस्ती अलग अलग त्यांची नावेही जातवार असल्याचे सांगतात. माधव कोंडविलकरांचा जन्म चांभार जातीत झाला आहे. चामड्याला चुनारंग चिकटावा तशी ही जात मला जन्मल्यापासून चिकटलेली आहे. चामडे तयार करताना सर्व अंगाला दुर्गंधी सुटत असे. जेवताना ओकारी येई पण पोटाची आग पेटलेली असे; कराव्या लागणाऱ्या कष्टाचे वर्णन करतात. पोटाच्या धडपडीसाठी सारा वेळ जातो. पादत्राणे तयार करायची ती फिरून विकायची. त्या मोबदल्यात मिळेल ते धान्य, शिळे-पाके आणायचे त्यावर उदरनिर्वाह करायचा. एखादेवेळी गिऱ्हाईक मिळाले नाही तर निराश व्हायचे. चांभार समाजात दारूचे व्यसन प्रचंड असल्याचे काही प्रसंगाद्वारे सांगतात. पाहुणे आल्यावर लग्न ठरविताना, देवधर्माचे विधी करताना बाळंपतपणाच्या वेळी दारूचा वापर केल्याचे सांगतात. देवधर्म, परंपरेचे विधी यावेळी अंद्धश्रद्धेतून अफाट खर्च केल्याचे प्रसंग येतात. माधव कोंडविलकर घराचे वर्णन करताना सांगतात घरात सर्वत्र चामड्याचे तुकडे जुन्या वाहणा, हत्यारे, कोंबड्याच्या शिटा एकंदर अस्वच्छतेचे साम्राज्य. त्यांना अस्पृश्यता विटाळ मानणाऱ्या अनेक प्रसंगाना सामोरे जावे लागले आहे. अशा वातावरणात माधव कोंडविलकरांनी शाळेची वाट जवळ

करून शिक्षण घेतले. पी. एस. सी. झाल्यानंतर बेहरे गुरुजींनी त्यांच्यासाठी मास्तरकीचा अर्ज भरला आणि थोड्याच दिवसात त्यांची नेमणूक मुरुडसारख्या दूरच्या गावी झाली. तेथून ते कुटुंबाला दुरावेले दिसतात. कोकणात आणि नोकरीच्या ठिकाणी अस्पृश्य असल्याने उपेक्षा होते. या आत्मकथनात अस्पृश्यतेची व्यथा तीव्रतेने व्यक्त होते. त्यांना आपल्या कुटुंबाचा उबग येतो. त्यासाठी ते बदली करून घेतात आपल्या समाजापेक्षा त्यांना पुस्तक जवळचे वाटते. त्यातच स्वत:ला गुंतवून घेतात. खरे तर शिक्षणाने सुसंस्कारित झालेल्या आर्थिक स्थिती बऱ्यापैकी असलेल्या व्यक्तीने आपल्या कुटुंबासाठी आपल्या समाजासाठी विधायक स्वरूपाची भूमिका घेतल्याचे दिसत नाही. येथे त्यांनी ज्ञानाच्या तिसऱ्या डोळ्याचे भान ठेवले नाही. फक्त स्वार्थी विचार केल्याचे स्पष्ट होते. व्यसनाधीन समाजाला अंधश्रद्धेत बुडलेल्या समाजाला वर काढण्याचे कार्य सुशिक्षितांचे आहे. याची प्रखर जाणीव त्यांच्यात दिसत नाही.

मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे' या संदर्भात वासुदेव मुलाटे लिहतात ''आपण आपल्या व्यथित माणसांसाठी काहीच करू शकलो नाही'' अशी नुसती खंत करीत बसल्याने त्यांच्या व्यथा कमी होणार नाहीत. म्हणून गाव बदलून घर बदलून त्या व्यथा कमी होत नसतात. समाजव्यवस्थेच्या चिरेबंद गढीत अंधारमय जीवन जगणाऱ्या माणसांना बाहेर काढायचे असेल तर गढीच्या भितींच तोडव्या लागतील. दुष्ट विषमतेवर जोपासलेला हा विषवृक्ष तोडताना घाव कमी पडतात म्हणून थकून चालणार नाही. हा विषवृक्ष कोसळणार आहे घावांची आणि घाव घालणाऱ्यांची संख्या वाढली पाहिजे''[२२] डॉ. मुलाटे यांचे मत अगदीच योग्य आहे. क्रांती करायची असेल आपल्या समाजाविषयी जिव्हाळा तळमळ असेल तर संघटित होऊन संघर्ष केला पाहिजे. मग अज्ञान असेल, अंधश्रद्धा असेल अस्पृश्यता असेल किंवा व्यसनाधीनता असेल ती यशस्वी होऊ शकेल.

**उपरा - लक्ष्मण माने :**

'उपरा' हे लक्ष्मण माने यांचे आत्मकथन २५ डिसेंबर १९८० साली प्रसिद्ध झाले. लक्ष्मण माने आपल्या आत्मकथनचा हेतू सांगताना लिहितात. ''जे जगलो ते भोगलं, अनुभवलं, पाहिल ते ते तसचं लिहित गेलो. कुणावर दोषारोप ठेवावा हा हेतू कधीच नव्हता. अनेकदा मोह होऊनही स्वत:ला सावरत

गेलो. ... या पुस्तकाने भटक्या विमुक्त जाती जमातींच्या प्रश्नावर सामाजिक मंथन सुरू झालं भटक्यांचे प्रश्न सामाजिक चर्चेचा विषय झाला. आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या मंडळीच्या कामाला चालना मिळाली तर पुस्तक लिहण्याचे श्रम सार्थकी लागेल असं मी समजेन. पिढ्यानपिढ्या बिऱ्हाड पाठीवर घेऊन जिणं जगणाऱ्या मंडळीच्या वेदना समाज समजावून घेऊन शकला तरी खूप झालं''[२३] भटक्या जाती जमातीच्या लोकांनी संघटित होऊन माणूसपणाचा मूल्यहक्क प्राप्त करून घेण्याची धडपड तीव्र आकांक्षा दिसते. त्यांच्या जीवनाला स्थिरता स्थैर्य प्राप्त व्हावे अशी मनोमन इच्छा आहे.

'उपरा' मध्ये कैकाडी समाजाचे चित्रण आले आहे. कैकाडी हा बलुते-अलुतेपैकी एक त्याने गावाची सेवा करायची कुणब्याला लागणारी पाटी कणगी द्यायची आणि त्या मोबदल्यात जे मिळेल ते घ्यायचे या समाजाला पोटासाठी एका गावाहून दुसऱ्या गावी अशी सतत भटकंती करावी लागते. ज्या गावात त्यांचा मुक्काम असे त्या गावाभोवतालच्या परिसरातून ते कणगी, झाप व पाट्या तयार करण्यासाठी लागणाऱ्या फोकांसाठी भटकतात. फोकांची ओझी आणून कणगी झाप तयार करून ते विकत आणि ते विकून येणाऱ्या पैश्यावर त्यांचा कसाबसा उदरनिर्वाह चालत असे एखादेवेळी अडचणीच्या ठिकाणी फोका मिळवत असताना सापाचे दंश होऊन प्राणास मुकावे लागते. गावात पोट भरेनासे झाल्यावर कैकाडी पुढच्या गावाला निघण्याच्या तयारीला लागत.

कैकाडी समाज गाढवाच्या पाठीवर आपली बिऱ्हाडे लादून असा भटकंती करीत पुढे निघतो. आणि ज्या गावात पोटापाण्याचा प्रश्न सुटेल असे वाटते त्या ठिकाणी आपली बिऱ्हाडे उतरवितो. आपला संसार उभा करतो. यांना गावात कधीच जागा मिळत नाही. गावाच्या घाणीच्या जागेवर आपला प्रपंच थाटावा लागतो. यांना कायमस्वरुपी एका गावी राहता येत नाही. अलुते म्हणून जी गावे दिलेली असतील. त्याच गावात प्रवेश मिळतो. त्यांना पोटाला पोटभर अन्न मिळत नाही. त्यामुळे त्यांना भीकदेखील मागावी लागते. शिळे, विटलेले, बुरशी आलेले अन्न खाण्यातसुद्धा अत्यानंद मानावा लागणारी या समाजाची दारिद्र्याची स्थिती असते.

कैकाडी समाजावर जातपंचायतीचा पगडा पाहावयास मिळतो. जत्रेच्यावेळी देवळामागे कैकाडी लोक जमतात. तेथे कैकाड्यांच्या जातपंचायती पुढे खटले न्यायनिवाड्यासाठी येत. या जातपंचायतीपुढे

14367

वादी-प्रतिवादी तर्फे त्यांचे जामीनदार बाजू मांडतात. त्यांना 'कै' म्हणतात. दोन्ही बाजू ऐकूण घेऊन शेवटी पंच आपला निर्णय देतात. पण यासाठी पंचांना शे-पाचशे रुपये मिळतात. तो पैसा दारूवर खर्च होतो. या जात पंचायतीमुळे सतत गुन्हे घडत नसावेत. कारण अवघ्या समाजापुढे मान-अपमानाची देवाण-घेवाण होत असते. परंपरावाद अंधश्रद्धा, अज्ञान यांनी या समाजाचा कब्जा घेतलेला दिसतो.

कैकाडी समाजात दारूचे व्यसन असलेली माणसे सर्वत्र पाहावयास मिळतात. लेखकाच्या वडिलांना दारूचे व्यसन होते. देवाची जत्रा असो, लग्नसोहळा असो, वा जातपंचायतीचा निवाडा असो सर्व ठिकाणी दारूचा वापर सर्रास झालेला पाहावयास मिळतो. कैकाडी समाजात अमाप अंधश्रद्धेचे प्रमाण दिसून येते. एखादे आजारी पडले की देवाकडे त्यांची धाव असते. अंगारा, लिंबू असा विधी करताना दिसतात. देवाला बकरे, कोंबडे व दारूचा नैवद्य करणे यासाठी काही वेळा कर्ज काढतात. पण देवधर्माचा विधी नित्यनेमाने करतात. देवाचा प्रसाद म्हणून मोठ्यापासून लहानानासुद्धा दारू देतात. अज्ञान अंधकारात बुडालेला समाज उपरामध्ये प्रकट झाला आहे.

'उपरा'मध्ये कैकाडी समाजात जन्मलेल्या लक्ष्मण माने यांच्या जीवनाची वाटचाल बिकट परिस्थितीतून झालेली आहे. या बिकट परिस्थितीला एकट्या लक्ष्मणलाच सामोरे जावे लागते असे नव्हे तर अवघ्या कैकाडी समाजाला दाहक स्वरुपाचे चटके सहन करावे लागतात. या समाजाच्या जीवनात चिरंतन अशी कोणती गोष्ट असेल तर कधीच न मिटणारी व संपणारी भूक. पोटामागे धावणारी वणवण फिरणारी ही माणसे आहेत अर्थातच याला प्रमुख कारण जन्मजात दारिद्र्य भूक यांचे भयान दर्शन घडवणारी अनेक प्रसंगचित्रे येथे आहेत. घरात अठराविश्वे दारिद्र्य आणि सवर्णांकडून अस्पृश्यतेचे चटके या कात्रीत सापडलेला हा समाज आहे. भूकेपायी चोरी करणे बँड वाजविणे अशी कामे करतो. असे कितीतरी प्रसंग या आत्मकथनात येतात. यांच्या शिक्षणासाठी एकच एक शाळा नाही पोट नेईल तिकडे शाळा, त्यातही अस्पृश्य असल्यामुळे वऱ्हांड्यात बसून शिक्षण, तेथे भाषेचा प्रश्न, भाषा समजायची नाही, वडिलांचा शाळेला विरोध , आईच्या प्रोत्साहनामुळे लक्ष्मण जिद्दीने शिक्षण घेतो. शिक्षण घेत असताना बिकट परिस्थितीशी सामना करावा लागला आहे. शिक्षण घेऊन हक्कांविषयी जागृत झालेले व्यक्तित्व प्रकट होते. 'उपरा' आत्मकथना संदर्भात वासुदेव मुलाटे म्हणतात, ''संस्कृतीने उपरा

ठरविलेल्या मनाची गाथा''[२४] वासुदेव मुलाटे यांचे मत अतिशय मार्मिक आहे. कारण या समाजाला कोणत्याही गावात कायमस्वरुपी थारा नाही. सतत भटकंतीचे जीवन त्यांच्यावर लादलेले आहे.

'तराळ-अंतराळ' शंकरराव खरात, 'काट्यावरची पोट' उत्तम बंडू तूपे 'उचल्या' लक्ष्मण गायकवाड, 'गबाळ' दादासाहेब मोरे, 'आभरान' पार्थ पोळके 'अक्करमाशी' शरणकुमार लिंबाळे, माज्या जन्माची चित्तर कथा, 'तीन दगडाची चूल' 'जिणं आमुचं' 'मरणकळा' 'भटक्या' 'कोल्हाट्याच पोरं' 'हकीकत' 'जटायू' केशव मेश्राम 'फांजर' नानासाहेब झोडगे, 'मिटलेली कवाडे' मुक्ता सर्वगोड 'गावकी' रुस्तूम अचलखांब 'धुळपाटी' श्रीरंग तलवारे, 'कोंडाळ' तुषार भाग्यवंत, 'मरणकळा' द. शि. सवाखंडे, 'आदोर' नजुबाई गावीत इत्यादी अशी कितीतरी दलित आत्मकथने जन्माला आलेली आहेत.

१९७८ ते २००० या वीस बावीस वर्षाच्या कालावधीत लहानमोठी पन्नासेक आत्मकथने ग्रंथ रूपाने प्रसिद्ध झाली. काहींची खूप चर्चा झाली ती गाजली. त्यांच्या गुणवत्तेमुळे मराठी साहित्याला त्यांनी समृद्ध केले. दलित आत्मकथनाच्याच नव्हे तर एकूण मराठी साहित्याच्या क्षेत्रात ही आत्मकथने अनन्यसाधारण ठरली. अशी ही आत्मकथने आहेत. काही अनुकरणीय, कलात्मकतेचा अभाव विस्कळीत रचना, तोच तोपणा यामुळे ती फारशी चर्चेत आली नाहीत विशेषत: 'बलुत' 'आठवणीचे पक्षी' 'हकीकत' 'जटायू' 'उचल्या' 'उपरा' 'गावकी' 'गबाळ' 'मरणकळा' यांना लाभलेले यश प्रशंसनीय आहे.

दलित आत्मकथनात विविध जाती जमातींच्या आत्मकथनांचा समावेश आहे. समाजातील दलित आणि उपेक्षित यामुळे प्रकाशात आली. पूर्वास्पृश्य असलेल्या महार, मातंग, चांभार, ढोर, लोहार, याशिवाय कैकाडी पिंगळा जोशी गोपाळ, कोल्हाटी या भटक्या समाजातील लेखक, लेखकांची 'उचल्या' 'बेरड' या गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जातीतील 'आदोर' आदिवासी समाजातील आत्मकथने आहेत. आत्मकथनाच्या क्षेत्रात पुरूषाप्रमाणे स्त्रियांनीही मोलाची भर घातली आहे. त्याही मागे नाहीत. या विविध लेखक लेखिकां जाती-जमातीचे प्रतिनिधित्व करतात.

या आत्मकथनातील एखादा दुसरा अपवाद वगळता ग्रामीण जीवनातील अनुभव येताना दिसते. याचे कारण आत्मकथनकार खेड्यातील आहेत. त्यांच्या या ग्रामीण जीवनातील. जीवनानुभवाच्या

निमित्ताने महाराष्ट्राच्या विविध परिसरातील समाज संस्कृतीचे विशेषत दलित आणि उपेक्षित संस्कृतीचे दर्शन घडते. त्यामुळे त्या त्या भागातील भौगोलिक परिसर, तेथील त्यांचे समज, अपसमज, अंधश्रद्धा, रीतीरिवाज, श्रद्धास्थाने, परंपरा रूढी, निसर्ग, पीक-पाणी, लोकजीवन, लोकभ्रम, बोलीभाषा इत्यादींचा परिचय होतो. लेखक-लेखिका ज्या जातीत जन्माला आले त्यांचे आचार-विचार, व्यवसाय, त्याचे स्वरूप, जातपंचायती, लग्नकार्ये, जन्मविधी, अंत्यसंस्कार इ. चार तपशील कळतो. महारवाडा, मांगवाडा, रामोसवाडा, हागनदारी, तांडा, चांभारवाडा माळरान, येथील दैन्य आणि दास्य यांच्या ओझ्याखाली जगणारी माणसे या आत्मकथनात भेटतात.

सर्वच आत्मकथनात अस्पृश्यते विषयक दाहक अनुभवही आलेले आहेत. अस्पृश्य असल्यामुळे नोकरी नाकारण्याचा अनुभव 'अंतस्फोट' मध्ये आढळतो. भूकेचे विदारक दर्शन आत्मकथनातून घडते. या सर्व आत्मकथनांनी साहित्य लेखनाच्या रुढी परंपरा नाकारून मराठीच्या वैभवात भर टाकली आहे पण समीक्षेच्या रूढ पद्धतीही बदलाव्या लागतील अशी अवस्था निर्माण केली आहे.

## दलित आणि वंचित मधील सामाभेद :

दलित या शब्दाची व्याप्ती ठरवताना प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या विचारांचा मागोवा घेतला पाहिजे कारण दलित साहित्याची प्रेरणाच मुळी आंबेडकरांची आहे. त्याचबरोबर इतरांनी सांगितलेल्या 'दलित' शब्दाच्या व्याख्या पाहिल्या पाहिजेत. (डॉ. बाबासाहबे आंबेडकर यांनी What Canres and Gandhi have dane to) सायमन कमिशनसमोर पुणे येथे दिनांक २३ ऑक्टोबर १९२८ रोजी बाबासाहेब आंबेडकर आणि हरसिंग गौर यांच्यात जो संवाद झाला तो पुढे दिलेला आहे.

प्रश्न - डॉ. आंबेडकर, दलित वर्ग आणि अस्पृश्य वर्ग हे दोन्ही आपण समानर्थी वापरता काय?

उत्तर - होय

प्रश्न - अस्पृश्य म्हणजे काय ह्याची व्याख्या तुम्ही सांगू शकाल?

उत्तर - "ज्या जातींपासून विटाळ होतो असे मानले जाते." बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य आणि 'दलित' हे शब्द समान अर्थानी योजलेले दिसतात दलित साहित्याच्या प्रारंभकाळात 'दलित' हा शब्द

अस्पृश्य जाती ह्या अर्थानेच वापरला गेला. पण पुढल्या काळात ह्या शब्दाची व्याप्ती वाढत गेली आज 'दलित' हा शब्द अस्पृश्य जाती, भटक्या विमुक्त जमाती आणि आदिवासी ह्या मानव समाजासाठी वापरला जातो.

काही विचारवंतांनी साहित्यिकांनी 'दलित' शब्दाची व्याख्या केलेली आहे. "दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीय नाही तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते सर्व 'दलित' या व्याख्येत येतात"[२६] बाबूराव बागूल

व. ना. वानखेडे - दलित म्हणजे अनुसूचित जाती, जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन, शेजमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती आदिवासी"[२७]

वसंत पळशीकर - "ब्राह्मणांपासून बौद्धांपर्यंत सर्व जातीत कमी अधिक प्रमाणात आपला दलित वर्ग पसरलेला आहे."[२८] या सर्व व्याख्या आर्थिक दृष्टीकोनातून केलेल्या आहेत.

दलित साहित्य म्हणजे काय?

दलित साहित्याची व्याख्या मांडताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री म्हणतात की, "दलितांची दु:खे कुचंबणा गुलामगिरी कौटुंबिक अध:पात विपन्नावस्था, विटंबना, ह्याबरोबरच दारिद्र्यतही तळपणारे सामर्थ्य, शौर्य, माणुसकी इत्यादी सर्वांगीन जीवनाचे कलात्मक शैलीचे साहित्य म्हणजे दलित साहित्य होय."[२८] या व्याख्येत दलितांच्या दु:ख दारिद्र्याचे कलात्मक चित्रण झाले पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे.

## डॉ. वानखेडे म. ना.

डॉ. म. ना. वानखेडे दलित साहित्य म्हणजे काय हे स्पष्ट करताना म्हणतात "दलित लेखकांनी दलितांविषयी निर्माण केलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य होय."[२९] डॉ. वानखेडे दलित साहित्याकडे सामाजिक दृष्टीकोनातून पाहतात. त्यांची व्याख्या जन्मजात दलित तत्वाला विशेष महत्व देणारी आहे. याशिवाय या साहित्यातून व्यक्त होणारा विद्रोह अस्पृश्यता, रूढी, परंपरा यांच्याविरुद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**प्रा. नरहर कुरुंदकर -**

नरहर कुरुंदकर म्हणतात की, ''प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, सहज प्रतिष्ठा आणि भीतीशून्य सुरक्षितता मिळाली पाहिजे. अशा भूमिकेतून निर्माण झालेली एक प्रवृत्ती वाङ्‌मयात अभिव्यक्त होत आहे. ह्या प्रवृत्तीला दलित साहित्य असे संबोधिले आहे.''[३०] कुरुंदकर यांच्या व्याख्येतला 'मानव' नेमका कोण आहे हे स्पष्ट होत नाही.

दलित साहित्यिकांनी दलितेतर साहित्यिकांनी व विचारवंतांनी 'दलित' व 'दलित साहित्य' याविषयी आपापल्या व्याख्या किंवा मते मांडण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर केला. मतमतांतर व वादविवादही मोठ्या प्रमाणावर झालेले दिसून येतात या सर्व व्याख्यांचा आणि मतमतांतराचा अभ्यास केल्यानंतर असे म्हणता येते की, समाज व्यवस्थेतील चातुर्वर्ण्य आणि गावगाड्यातील बलुतेदार अलुतेदार यातून 'दलित' संकल्पनेचा उदय झाला. ज्यांच्या वाट्याला दु:ख, दारिद्रय, अपमान, उपेक्षा, अवहेलना, उपासमार त्यांच्या केवळ जातीमुळे येते त्यांना 'दलित' म्हणावे व त्यांनी लिहिलेल्या त्यांच्या जीवनविषयक साहित्याला दलित साहित्य म्हणावे.

**वंचितांच्या जीवनाची पार्श्वभूमी :**

भारतात किंवा महाराष्ट्रात बारा बलुतेदार पद्धती आहेत. हे सर्वश्रुत आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात अठरापगड जाती-जमाती आहेत. त्याचा खोलवर विचार आणि अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्याकडे 'गावगाडा' हा शब्द नेहमी वापरला जातो. त्याचा विवेचक अर्थ म्हणजे ज्या वसतीला वसाहत योग्य जमीन असून शेतकरी आणि मजूर आहेत. त्या वसतीला 'गाव' म्हणतात. या गावाची जी सीमा किंवा शीव त्यात गावठाण्याचा भाग 'पांढरी' म्हणून ओळखला जातो. तर उर्वरित शिवार 'काळी' या नावाने ओळखला जातो. पांढरीत किंवा गावठाणात शेतकऱ्यांची मुख्य वसती असते. व त्याच्याभोवती 'कारू-नारू' जातींची घरे असतात.

'कारू' म्हणजे करणारा त्याचे कौशल्य आणि मेहनत शेती व्यवसायाला साहाय्यभूत होते. शेतकरी त्याच्या उद्योगाला निरनिराळ्या जातधंद्याच्या माध्यमातून मदत करणाऱ्या या जातींच्या लोकांना शेतीच्या उत्पादनातून त्यांच्या हक्काचा वाटा वंशपरंपरेने देतो. त्याला 'बलुते' म्हणतात.

'नारू' बलुतेदारांशिवाय जे बाहेरून (आगंतुक) फिरस्त्या भटक्या जमाती येतात त्यांना 'नारू' किंवा 'अलुतेदार' म्हणतात. शेतकरी, कारू आणि नारू मिळून 'गावगाडा' बनतो. आपली समाजरचना अशी वर्णव्यवस्थेवर आधारित असलेली ग्रामरचना आहे. गावगाडा म्हणजे एकंदर गावाचे कुटुंब त्यात कुणबी हा कारभारी, कारू स्थायिक वतनदार हे कुटुंबिय आणि नारू हे सोयरे इष्टमित्र असे त्यांना स्थान असते.

| अशा या प्राचीन काळापासून चालत आलेल्या ग्रामसंस्थेची चौकट जी एकदा पक्की झाली ती इतकी की, नंतर त्यात कुणीही प्रवेश करू शकले नाही. म्हणूनच ग्रामसंस्थेच्या संपर्कात अनेक शतके येऊनही आणि गावगाड्याच्या आश्रयाने जीवन जगत असूनही भटक्यांचे वंचितांचे जीवन जगत असलेल्या जाती ग्रामसंस्थेत दाखल होऊ शकल्या नाहीत. त्यांना कोणत्याही गावात वतनदार होता आले नाही. गावगाड्याबाहेर राहूनच वंचिताचे / भटक्यांचे जीवन जगावे लागत आहे. याची कुठेतरी वाच्यता व्हावी म्हणूनच लक्ष्मण मानेने आपल्या आत्मकथनाला 'उपरा' असे शीर्षक दिलेले असावे असे वाटते.|

गावगाड्यात 'फिरस्ते' हे सोयरे असे म्हटले असले तरी फिरस्त्यांची एकूण स्थिती पाहिली आणि गावगाड्याचे त्यांचे संबंध पाहिले तर त्यात सत्याचा अल्पांश आहे असे दिसून येते. इंग्रजी शासन भारतात आल्यापासून येथील गावड्यांची किंवा ग्रामसंस्थेची समाज मनावर असलेली पकड सैल झाली. त्यात या वंचितावर 'गुन्हेगार' हा शिक्का बसला. परंतु बलुतेदार पद्धत आजही घट्ट आहे. अशा पुरातन ग्रामरचनेवर अनेक राज्यांतरे झाली, स्थित्यंतरे झाली तरी ती टिकून राहिली आहे. या घट्ट रचनेमुळे भटक्या आणि विमुक्त जाती-जमातींना त्यात सामील होता आले नाही. गावाचे सामुहिकपणे करावयाचे विधी असतात. त्यात प्रत्येक जातीला काहीतरी भूमिका (रोल) असते. भटक्या आणि विमुक्त जातींना त्यात प्रवेशच मिळाला नसल्याने गावाच्या सार्वजनिक विधी उत्सवात त्यांचा सहभाग असणे शक्यच नाही. ग्रामरचनेतील समाजाने त्यानां जवळ केले नाही. त्यांच्याकडे भीतीग्रस्त, संशयी गुन्हेगार दृष्टीनेच पाहिले. त्यामुळे गावगाड्यातील समाज आणि गावगाड्याबाहेरचा समाज यांच्यात केवळ अंतर निर्माण झाले नाही तर दरी निर्माण झाली. ते गावगाड्यातील समाजात सामील झाले नाहीत. त्यांचे घटक झाले नाहीत.

समाजबाह्य राहिले. गावगाड्याबाहेर असल्यामुळे त्यांना वंचिताचे जीवन जगावे लागत आहे. आपल्या मूल्यहक्कापासून वंचित राहवे लागत आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून पंचावन्न वर्षे झाली तरी या व्यवस्थेने त्यांना काहीच दिले नाही. स्थिर असणारा पण समाज व्यवस्थेने गावकुसाबाहेर ठेवलेला दलित समाज संघटित होऊन आपल्या समस्या, आपले प्रश्न सोडविण्यासाठी जागरूकतेने संघर्ष करतो आहे. पण जे लोक अद्यापही या देशात 'उपरे' आहेत. समाज व्यवस्थेत ज्यांना स्थान नाही. ज्यांच्या भाकरीचा प्रश्न सुटला नाही. त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला या व्यवस्थेने ज्यांचे अस्तित्व नाकारले, त्यांना गाव नाही जागा नाही, घर नाही, ठावठिकाणा नाही, अशाकडे कुणाचेही लक्षही नाही. मानवी जीवनाच्या ज्या मुलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा यालाच ते मुकले आहेत. या भटक्या जमाती स्थिर नसल्याने शिक्षणही घेऊ शकल्या नाहीत त्यामुळे ते संघटित होऊ शकत नाहीत कायम दारिद्र्यात जीवन जगावे लागते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी भारतातील समाज रचनेचे विवेचन करताना जनसमूहांचे पाच वर्ग केले आहेत.

**१) वरिष्ठ वर्ग :**

''यात अधिकारी, सरदार, मानकरी, व्यापारी इत्यादींचा समावेश होतो.

**२) मध्यमवर्ग :**

यात सर्वसाधारणपणे नोकऱ्या करणारे त्याचप्रमाणे कलाकौशल्याची कामे करून उदरनिर्वाह करणारे दुकानदार आणि शेतकी करणाऱ्या पांढरपेशींचा अंतर्भाव होतो.

**३) कनिष्ठवर्ग :**

आपले पोट भरण्यासाठी काबाड-कष्ट करणारे उदा. न्हावी, धोबी, माळी इत्यादींचा समावेश

**४) हीन वर्ग :**

यात महार, मांग, चांभार, पारिया, शिक्किया, नामशुद्र, डोंब, धेड, मेहतर, मिरासी अशा नीच मानलेल्या जातींचा समावेश होतो.

५) **अलग वर्ग :**

इंग्रजी राज्य किंवा लहानमोठी संस्थाने यांच्या सरहद्दीवर डोंगरातून आणि जंगलातून राहणारे कोंग, शिकलगार, चिगली, बिगली, खोंड वगैरे अर्धवट रानटी जातींचा अंतर्भाव होतो.''[३१]

वरीलपैकी तीन वर्गांचा हिंदी समाजात समावेश होतो. त्यांना सामाजिक हक्क असतात. त्यांच्यात रोटीबेटी व्यवहार नसला तरी ते परस्परांना मानपान देतात. त्यांचा एक मुख्य भेद असतो. चौथा वर्ग हीन वर्ग म्हणून मानण्यात येतो. तो हिंदी साम्राज्यांतर्गत असला तरी समाजबाह्य असतो, म्हणून दुसरा भेद मानला पाहिजे. साम्राज्याचा किंवा संस्थानिकांची रयत नसलेला पाचवा वर्ग साम्राज्यबाह्य आणि समाजबाह्य म्हणून तिसरा मुख्य भेद होतो.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांच्या काळातील एकूण समाजस्थितीचे चित्र रेखाटले असले तरी आज आपल्या भारताला स्वातंत्र्य मिळून पंचावन्न वर्षे झाली आणि भारतीय घटनेने सर्व नागरिकांना कायद्याच्या दृष्टीने समान मानले असतानाही त्यात फारसा फरक जाणवत नाही. पूर्वी साम्राज्याबाह्य आणि समाजबाह्य असलेल्या जाती आता भारतीय प्रजासत्ताकाच्या घटक झाल्या असल्या आणि इंग्रज शासनाने त्यांच्यापैकी काही जातींना लागू केलेला गुन्हेगार जमातींचा कायदा रद्द करून त्यांना विमुक्त केले असले तरी अजूनही त्यापैकी काही जमाती भटक्यांचे जीवन जगतात. अन्याय सहन करतात. 'पारध्यांची पारध कधी थांबणार' या लेखात लक्ष्मण गायकवाडनी दिलेल्या घटना पारध्यांचे हत्याकांड १९७६ ढोकी, १) ३ डिसेंबर १९९९ चे बारामती नजिक झारगरवाडी, ३) बारामती नजिक तांदूळवाडी पिऱ्या पारध्याला पोलिसांनी मारला डिक्सळची घटना १९९८ इंदापूरच्या तळ्यात मासे पकडले म्हणून त्यांनी बँकेचे कर्ज काढून घेतलेले जाळे जप्त केले वरून पोलिस कोठडी''[३२] या घटना पाहिल्या तर आजही या समाजाकडे गुन्हेगारी दृष्टीने पाहिले जाते. त्यांच्यावर अत्याचार केला जातो. पूर्वीप्रमाणेच आजच्या काळातही या जातीचा 'तिसरा मुख्य भेद'च आहे. गावगाड्यात त्यांना कोणतेच स्थान नाही.

**अभ्यासकांनी भटक्या जातीचे केलेले वर्गीकरण :**

गावगाड्यात किंवा ग्रामरचनेत ज्या जातींना स्थान प्राप्त झालेले नाही अशा भटक्या जातींचे वर्गीकरण निरनिराळ्या तत्वांवर केले आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

**बेक यांनी १९५४ मध्ये पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.**

१) भटके - कुठेही घर नसते कोणतेही गाव नसते आणि सदैव या गावाहून त्या गावास असे उपजीविकेसाठी त्यांना सहकुटुंब भटकावे लागते.

२) अर्धभटके - कुठेतरी स्थायी जीवन जगतात अगदी वर्षातून काही महिने व्यवसायाच्या स्वरुपामुळे किंवा पोट भरण्यासाठी त्यांना भटकावे लागते.[३३]

**इन्सायल्कोपीडिया ऑफ सोशल सायन्सेसमध्ये**[३४]

१) शिकारी व संग्राहक भटके

२) पशुपालक जाती

३) कृषि जीवनाधिष्ठित भटक्या जाती

**'भारतातील विमुक्त-भटक्या जाती जमातींच्या अभ्यासाचे उद्‌गाते राद्यवय्या'**[३५]

१) परंपरेने भटक्यांचे जीवन जगणाऱ्या जमाती

२) पशुपालक जमाती

३) मोसमी भटके किंवा व्यवसायाच्या निमित्ताने वर्षातून काही काळ भटक्यांचे जीवन जगणारे.

४) गुन्हेगारांच्या भटक्या जमाती

५) व्यावसायिक भटके

६) भिक्षुक भटके किंवा भिक्षा मागून जगणारे भटके यांचे खालीलप्रमाणे एक वर्गीकरण केले आहे.

  १) अर्ध भटके

  २) पशु पालक भटके

  ३) व्यावसायिक भटके

  ४) समाजोपयोगी काही सेवा करणाऱ्या भटक्या जमाती

  ५) इतर भटक्या जमाती

वरील वर्गीकरणापैकी बेकन यांनी केलेले वर्गीकरण साधारणत: योग्य वाटते. त्यातही गुन्हेगारांच्या भटक्या जमाती आल्या नसल्यामुळे थोडेसे अपुरे वाटते. वास्तविकपणे भटक्या जातीचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे असावे.

**१) भटके -**

कुठेही घर नसते. कोणतेही गाव नसते आणि सदैव या गावाहून त्या गावास असे उपजिविकेसाठी त्यांना सहकुटुंब भटकावे लागते.

**२) अर्ध भटके -**

या प्रकारात अशा जातींचा सामवेश असतो की ज्या कुठेतरी स्थायी जीवन जगतात अगदी वर्षातून काही महिने व्यवसायाच्या स्वरुपामुळे किंवा पोट भरण्यासाठी त्यांना भटकावे लागते.

**३) गुन्हेगारांच्या भटक्या जमाती -**

'भटक्या (जाती जमातींची) या शब्दाची काही अभ्यासकांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

नरेंद्र गोपाल राव यांनी २५ फेब्रवारी १९७० यावर्षी 'भटक्या जमाती' दिनाच्या (Nomadic Tribe's day) निमित्ताने प्रकाशित झालेल्या स्मरणिकेत जो लेख लिहिला आहे त्यात भटक्या जातींची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे.

"The term nomadic groups should be applied to those cultured or ethric groups or large segments there of who are fraditionally nomadic and bound to nomadism by their economic Pattern rooted in their culture"[३६]

२) ग्रीक भाषेतील 'नोमो' या शब्दापासून भटका हा शब्द रूढ झाला. 'गवताळ प्रदेशात गुरेढोरे' पाळणारा व प्राण्यांचे कळप घेऊन नेहमी करिता, काही काळासाठी भटकणाऱ्या जमातीला 'भटका' NOMAD असे म्हणतात''[३७]

३) 'सतत भटकत राहणारा समाज म्हणजे भटका'[३८] अशी ढोबळ व्याख्या प्रा. मोतीराम राठोड यांनी केली आहे.

४) 'व्यापाऱ्याच्या निमित्ताने गावोगावी भटकत असलेला आणि भिक्षा मागून किंवा काही पारंपरिक कलेच्या आधाराने स्वत:ची उपजीविका करणारा लोकसमूह अनेक वर्षापासून महाराष्ट्रात वेगवेगळ्या जाती-जमातीच्या नावाने जीवन जगताना आढळतो. अशा समूहांना भटके विमुक्त म्हणतात''[३९]

वरील सर्वच व्याख्येत काहींना काही तथ्यांश आहे. 'भटक्या' जीवनातील घटक त्यात समाविष्ट होतात. भटके, रूढीग्रस्त अज्ञान, व्यवसायविहीन अशा जाती. जमातींचे लोक विकासाच्या प्रयत्नापासून, शिक्षणापासून उपेक्षित आहेत त्यांना भटके किंवा वंचित म्हणावे असे वाटते.

## संदर्भ


१) दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया, लेखक - गो. म. पवार, प्रकाशक - सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे, द्वितीय आवृत्ती - ऑगस्ट १९९७, पृ. ४३.

२) दलित साहित्य नवे आत्मशोधन लेख: विचार भारती, ऑक्टोबर -नोव्हेंबर १९९२, नारायण सुर्वे

३) मार्क्सवादी आणि दलित साहित्य : लेखक - डॉ. वि. स. जोग, प्रकाशक - संबोधिनी प्रकाशन मुंबई, आवृत्ती - १९८५, पृ. १४.

४) 'फुआमा' नियतकालिक एका यशस्वी लेखकाची मुलाखत

५) दलित साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया: लेखक - गो. म. पवार, प्रकाशक - मेहता पब्लिशिंग हाऊस, आवृत्ती - ऑगस्ट १९९७, पृ. ६८.

६) नाकेबंदी : प्रस्तावना, लेखक - राजा ढाले, प्रकाशक- ज. वि. पवार, मुक्तछंद प्रकाशन, आवृत्ती १९७६, पृ. १-१६.

७) दलित कथा आणि विकास मनोगत : लेखक - डॉ. प्रकाश खरात, प्रकाशक - सुगावा प्रकाशन, पुणे ३०

८) संतांची अभंगवाणी : संपादक - डॉ. एस. एस. भोसले, डॉ. ल. का. मोहरीर, प्रकाशक - सूर्यकांत दाणेकर, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती - १९९९, पृ. ७९

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे: प्रा. गांजरे मा. फ., आवृत्ती १९७४ खंड दुसरा, पृ. १५३.

१०) डॉ. आंबेडकरांचा अस्पृश्यांना संदेश 'नवयुग' : आंबेडकर विशेषांक १३ एप्रिल १९४७, डॉ. आंबेडकर भी. रा.

११) दलित साहित्य : एक अभ्यास : या ग्रंथातून, उद्‌धृत, साहित्य संस्कृती मंडळ - संपादक - अर्जुन डांगळे, पुणे १९७८, लेखक - प्रा. ग. बा. सरदार, पृ. २२२

| | | | |
|---|---|---|---|
| १२) | दलित साहित्याचे आदिरूप : दलित साहित्य वेदना आणि विद्रोह | : | लेखक - भालचंद्र फडके, प्रकाशक - श्री विद्या प्रकाशन पुणे, आवृत्ती - १९७७, पृ. ६५. |
| १३) | दलित साहित्य : प्रेरणा व प्रवृत्ती | : | लेखक - शंकरराव खरात, प्रकाशक - इनामदार बंधु प्रकाशन, पुणे, आवृत्ती - १९७८, पृ. २८. |
| १४) | दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते | : | डॉ. योगेंद्र मेश्राम, प्रकाशक - सौ. नंदिनी तु. गवळी कोल्हापूर, आवृत्ती १९८७, पृ. ६७. |
| १५) | दलित साहित्य : सिद्धांत आणि स्वरूप | : | डॉ. यशवंत मनोहर, प्रकाशक - प्रबोधन प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती - १९७८, पृ. १. |
| १६) | सूड | : | प्रस्तावना - डॉ. म. ना. वानखेडे, लेखक - बाबूराव बागूल, प्रकाशक - लोकवाङ्मय ग्रह प्रकाशन मुंबई, द्वितीय आवृत्ती - १९८१, पृ. ७. |
| १७) | बलुतं | : | लेखक - दया पवार, मनोगत |
| १८) | बलुतं | : | प्रथमावृत्ती - २४ डिसेंबर १९९८, लेखक - दया पवार, द्वितीय आवृत्ती, मनोगत |
| १९) | आठवणीचे पक्षी | : | लेखक - प्र. ई. सोनकांबळे, प्रथमावृत्ती - २७ जानेवारी १९७९, प्रस्तावना. |
| २०) | दलितांची आत्मकथने : संकल्पना स्वरूप | : | लेखक - डॉ. वासुदेव मुलाटे, प्रकाशन - उषा व मुलाटे, स्वरूप प्रकाशन 'अक्षर' ८५८ सह्याद्री नगर, एन - ५ (दक्षिण सिडको) औरंगाबाद, पृ. ९५ |
| २१) | दलित साहित्य एक आकलन | : | लेखक - बाळकृष्ण कवठेकर, प्रकाशन - श्री अनिलकुमार मेहता, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - १९८१, पृ. ८९. |
| २२) | दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप | : | डॉ. वासुदेव मुलाटे, प्रकाशन - स्वरुप प्रकाशन औरंगाबाद, पृ. १०४. |
| २३) | उपरा | : | लेखक लक्ष्मण माने, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती २५ डिसेंबर १९८०, मनोगत. |
| २४) | दलितांची आत्मकथने : संकल्पना स्वरूप | : | लेखक - डॉ. वासुदेव मुलाटे, प्रकाशन - स्वरुप व प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १०५. |
| २५) | दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र | : | लेखक - डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रकाशक - अरुण म. कांबळे, कांता प्रकाशन, १६२/४२२ गाडेगाव रोड बार्शी जि. सोलापूर, पृ. ११. |

| | | | |
|---|---|---|---|
| २६) | दलित साहित्य संमेलन नागपूर | : | १९७६, स्मरणिका बाबूराव बागूल. |
| २७) | दलित साहित्य संमेलन नागपूर | : | १९७६, अध्यक्षीय भाषण. |
| २८) | दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र | : | लेखक - डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रकाशन - कांता प्रकाशन बार्शी, पृ. ११. |
| २९) | सूड | : | लेखक - बाबूराव बागूल, द्वितीय आवृत्ती, प्रस्तावना. |
| ३०) | निकाय | : | एप्रिल १९७६, नरहर कुरुंदकर, पृ. ५९. |
| ३१) | भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न | : | लेखक - विठ्ठल रामजी शिंदे, पृ. १८७-१८८. |
| ३२) | साहित्य समाज आणि स्वातंत्र्य | : | लेखक - लक्ष्मण गायकवाड, प्रकाशक - राजीव दत्तात्रय बर्वे, मॅनेजिंग डायरेक्टर, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती - १५ मार्च २००१, पृ. ५३, ६६, ५७ |
| ३३) | गावगाड्याबाहेर | : | लेखक - डॉ. प्रभाकर मांडे, प्रकाशन - अनंत दाशरथे, परिमल प्रकाशन, खंडेश्वर, औरंगाबाद, प्रथमावृत्ती - सप्टेंबर १९८३, प्रास्ताविक |
| ३४) | तत्रैव | : | प्रास्ताविक |
| ३५) | तत्रैव | : | प्रास्ताविक |
| ३६) | तत्रैव | : | प्रास्ताविक |
| ३७) | वेदनांचा प्रदेश | : | लेखक - डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर, प्रकाशक - के. एस. अतकरे कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती - मार्च २०००, पृ. १७७. |
| ३८) | तत्रैव | : | पृ १७७ |
| ३९) | तत्रैव | : | पृ. १७७ |